गांवकरी
www.gavakari.net
13 Feb 2025 - Page 2

■ नाशिक, गुरुवार, दि. १३ फेब्रुवारी २०२५

## महत्त्वाचे

# डॉ. मृदुला दाढे-जोशी यांचे सोमवारी व्याख्यान

**नाशिक : वार्ताहर**

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै.



बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आमंत्रित केले जात असते. या उपक्रमांतर्गत १८ वे पुष्प के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक यांच्या वतीने सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वा. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे गुंफले जाणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात गायिका आणि चित्रपट संगीत अभ्यासक डॉ. मृदुला दाढे-जोशी या नौशाद ते अजय-अतुल : एक संगीत प्रवास या विषयावर प्रयोग सादर करतील. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शंकरराव वैरागकर हे भूषविणार आहेत. डॉ. मृदुला दाढे-जोशी या मुंबई विद्यापीठात संगीत विभागात कार्यरत असून, देश - विदेशात त्यांनी भारतीय चित्रपट संगीतातील सौंदर्यस्थळे उलगडून दाखवणारे शेकडो कार्यक्रम सादर केले आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर व अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांनी केले.